कर्दळीवन सेवा संघ, पुणे आयोजित

संपूर्ण नर्मदा परिक्रमेइतकीच पुण्यदायी

# ३ दिवसांची नर्मदा परिक्रमा

## चैत्र २०२३ महिन्यातील
## उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमा
## (बडोदा, गुजरात जवळ)



* गरुडेश्वर दर्शन
* स्टॅच्यु ऑफ युनिटी
* कन्यापूजन



* पायी चालणे - फक्त १८ कि.मी   * रिक्षा / वाहनाने सुद्धा करता येते.

**शुल्क फक्त रु. ९९९९/- + (GST ५%) पुणे ते पुणे एसी स्लीपर बसने प्रवास**

**आयुष्यात एकदा तरी अनुभवावी अशी नर्मदामैयाची एक उत्कट अनुभूती...**

चैत्र २०२३ : 1 २४ ते २६ मार्च 2 ३१ मार्च ते २ एप्रिल 3 ३ ते ५ एप्रिल 4 ७ ते ९ एप्रिल 5 १० ते १२ एप्रिल 6 १४ ते १६ एप्रिल

ऑनलाईन नोंदणी करा - www.kardaliwan.com/narmada

॥कर्दळीवन॥
सेवा संघ

६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन, पुणे - ४११ ००४.
ईमेल : swami@kardaliwan.com
व्हॉट्सॲप : 9657709678 मो. 7057617018

।। नर्मदे हर ।। नर्मदे हर ।। नर्मदे हर ।। नर्मदे हर ।। नर्मदे हर ।।

।। श्री गुरूदेव दत्त ।। श्री स्वामी समर्थ ।।

# उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा

संपूर्ण नर्मदा परिक्रमेइतकीच पुण्यदायी परिक्रमा...

नर्मदा परिक्रमा हे प्रत्येक भाविकाचे स्वप्न आहे. नर्मदेच्या नुसत्या दर्शनानेही आपण रोमांचित होतो. अशा वेळी तिचा प्रत्यक्ष सहवास घडविणारी ही परिक्रमा आपल्या जीवनाला जणू एका अद्‌भुत अनुभूतीचा परीस स्पर्श करुन जाईल. गंगा आणि नर्मदा या दोनच नद्या त्यांच्या प्रवाहमार्गामध्ये उत्तरवाहिनी बनून वाहतात. त्या जिथे उत्तरवाहिनी बनून वाहतात ते ठिकाण अतिशय पवित्र आणि मोक्षदायी असते अशी श्रद्धा आहे. गंगा काशीमध्ये उत्तरवाहिनी आहे आणि नर्मदा रामपुरा–तिलकवाडा–गुजरात येथे उत्तरवाहिनी आहे. त्रेता युगामध्ये बली नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची मुलगी रेवती त्यावेळच्या सर्वसाधारण पुरूषांपेक्षाही २ फूट अधिक उंच होती. तिचा विवाह कसा होणार याची त्याला चिंता होती. एके दिवशी तो ब्रह्मदेवाला भेटायला गेला. त्यावेळी ब्रह्मदेव कामामध्ये होते. त्यांनी बलीराजाला थांबायला सांगितले. बलीराजा दारातच थांबला. काम संपवून काही वेळानंतर ब्रह्मदेव बळीराजापाशी आले तेव्हा पृथ्वीवर त्रेतायुग संपून द्वापार युग सुरू झाले होते. कारण ब्रह्मदेवाची कालगणना आणि पृथ्वीवरची कालगणना यामध्ये खूप अंतर आहे. ब्रह्मदेवाने बलीराजाला सांगितले, हे राजन, तू उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा कर. त्यानंतर रेवतीला योग्य असा पती मिळेल. बलीराजाने उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा केली. तेव्हा नर्मदा मैया प्रकट झाली आणि तीने द्वापारयुगातील नारायणाचा (विष्णू) अवतार असलेल्या श्रीकृष्णाचे जेष्ठ बंधू बलराम यांचेबरोबर रेवतीचा विवाह कर अशी आज्ञा केली. बलीराजा अतिशय आनंदून गेला. त्याने नर्मदामैयाला वंदन केले आणि तिला तो म्हणाला हे माते, जी व्यक्ती संपूर्ण नर्मदा परिक्रमा करु शकणार नाही. त्या व्यक्तीने या ठिकाणी उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली तर तिला संपूर्ण नर्मदा परिक्रमा केल्याचे पुण्य मिळेल असा तू आशिर्वाद दे. नर्मदा मैया राजाची विनंती ऐकून आनंदित झाली. ती म्हणाली, फक्त स्वत:चाच विचार न करता सर्वांचा विचार करण्याचा तुझा हा स्वभाव खूप चांगला आहे. तुझी इच्छा पूर्ण होईल. उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला संपूर्ण नर्मदा परिक्रमा केल्याचे पुण्य मिळेल.

बलीराजाला आशिर्वाद देऊन नर्मदामैया गुप्त झाली. तेव्हा पासून उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेची परंपरा सुरु आहे. सर्वांनाच ३ वर्षांची किंवा १०८ दिवसांची पायी परिक्रमा करता येत नाही. १८ दिवसांची बसने परिक्रमा सध्याच्या धकाधकीच्या जीवनात करता येणे अनेकांना अवघड असते. अशा सर्वांसाठी ३ दिवसांची उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा ही एक अतिशय आनंदाची पर्वणी आहे. तीन दिवस नर्मदेच्या सान्निध्यात राहून नर्मदा परिक्रमेचा अनुभव घेता येतो. तसेच नर्मदापूजन, कन्यापूजन, कढई आणि भंडारा करता येतो. संपूर्ण नर्मदा परिक्रमेचे पुण्य मिळते. नर्मदा मैय्याची जवळून ओळख होते. भविष्यात कधीतरी पूर्ण नर्मदा परिक्रमा करण्याची ओढ लागते. पूर्ण नर्मदा परिक्रमेची पहिली पायरी म्हणूनही या उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेकडे पाहिले जाते. प्रत्येकाने एकदा तरी उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा करुन नर्मदा परिक्रमेच्या दैवी अनुभूतीचा अनुभव घेतला पाहिजे.

## परिक्रमेचा नियोजित कार्यक्रम

पहिला दिवस – पुणे येथून आदल्या दिवशी ११ वाजता/ घोडबंदर रोडहून सकाळी ६–७ वाजता प्रस्थान. संध्याकाळी ५ वाजता नर्मदा किनारी आगमन + मुक्काम.

दुसरा दिवस – सकाळी ५ वाजता नर्मदा पूजन + संकल्प – परिक्रमेला सुरुवात. दुपारी १२ वाजेपर्यंत मंगरोल येथे परिक्रमा समाप्त कन्यापूजन + भंडारा + भोजन. दुपारी २ नंतर गरुडेश्वर + स्टॅच्यु ऑफ युनिटी. रात्री जेवण + मुक्काम.

तिसरा दिवस – सकाळी ७ वाजता पुण्याकडे प्रयाण. रात्री ८ वाजता पुणे येथे परत.

- परिक्रमेसाठी चालणे – परिक्रमेसाठीचे एकूण चालणे अंदाजे १८ कि.मी. आहे. यातील सुमारे ९ कि.मी. चालणे गावातून आणि बाकीचे कच्च्या रस्त्यावर आहे. परिक्रमेदरम्यान दोन वेळा नर्मदा होडीमधून पार करावी लागते. होडीचे शुल्क समाविष्ट आहे.
- रिक्षाने–वाहनाने परिक्रमा – ज्यांना रिक्षा/वाहनाने परिक्रमा करावयाची आहे, त्यांना त्यासाठीचे शुल्क रु. ७००/– परिक्रमेच्या ठिकाणी द्यावे लागेल. साधारण चार ते पाच तास एवढा वेळ लागेल.

## उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेमध्ये खालील प्रकारे नोंदणी करावी

१) पुणे ते पुणे – एसी आरामदायी स्लीपर बसने (३० सीटर) परिक्रमा आहे. घोडबंदर रोड, ठाणे येथूनही सहभागी होता येईल.

२) उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा नोंदणी अर्ज + संमती हमीपत्र (नमुना जोडला आहे) आणि आयडेंटि साईज १ फोटो आणि पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड यापैकी काहीतरी एकाची झेरॉक्स प्रत आणि शुल्काची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन NEFT ट्रान्सफर करुन भरता येईल. तसेच ईमेल द्वारा किंवा कुरियरने पाठवता येईल.

३) परिक्रमेसाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्यामुळे ''प्रथम नोंदणी प्रथम प्रवेश'' या तत्त्वावर नाव नोंदणी सुरू आहे. नोंदणी करताना सर्व रक्कम रु. ९९९९/– एवढी भरावी लागेल. रोखीने भरल्यास जीएसटी लागणार नाही परिक्रमेमध्ये सहभागी होण्यासाठी एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. आणि नोंदणी रक्कम परत मिळणार नाही. बदली व्यक्ती देता येईल. परिक्रमेदरम्यान आधी विहित केलेली एखादी कृती काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही.

**उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेसाठी व्यवस्था सेवा सहयोग राशी**

**₹९९९९/– + ५% जीएसटी (₹५००/–) प्रति व्यक्ती**

**बँक खात्याची माहिती**

खात्याचे नाव :– कर्दळीवन सेवा संघ एल.एल.पी बँकेचे नाव :– बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा,
चालू खाते क्र. ६०३५१९२१२८६IFS Code : MAHB0000003

# उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेसाठीची व्यवस्था

१) परिक्रमेमध्ये शाकाहारी चहा-नाष्टा-भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. राहण्याची एकत्रित व्यवस्था आहे. मुक्कामाची व्यवस्था आश्रमामधील धर्मशाळेमध्ये आहे. तेथे स्नान, प्रातःर्विधीसाठी संडासची मर्यादित व्यवस्था आहे, याची कृपया नोंद घ्यावी. मुक्कामांच्या ठिकाणी गादी, उशी, पांघरुणण आणि बाथरुम, कमोड यांची व्यवस्था केली आहे. दंतमजन, पाण्याची बाटली, टॉर्च प्रत्येकाने स्वत: बरोबर घ्यावे. परिक्रमा सकाळी लवकर सुरू केली जाते. उन्हापासून बचावासाठी सनकोट, सुती उपरणे घ्यावे. या परिक्रमेत उपवासासाठी आणि कांदा लसणा शिवायच्या आहाराची कोणतीही व्यवस्था नाही. स्वत:चे कपडे एक अंगावर-अधिक २ कपडे जोड, रात्री झोपताना लागणारे कपडे, शॉल बरोबर घ्यावेत. नेहमी लागणारी औषधे, इतर वस्तू आपल्या बरोबर घ्याव्यात. तसेच कमीत कमी कपडे आणि सामान घ्यावे. हाफ पँट किंवा बर्मुडा घेऊ नयेत. पायात बूट (स्पोर्ट शूज) असावेत, मौल्यवान वस्तू घेऊ नयेत. सामानासाठी पाठीवरची सॅक घ्यावी. पिशवी किंवा प्रवासी बॅग घेऊ नये. ज्यांना वेळेवर औषधे घ्यावी लागतात आणि त्याआधी खावे लागते, अशा व्यक्तींनी त्यासाठी सुके खाद्य पदार्थ स्वत:बरोबर घ्यावेत. नाष्टा किंवा जेवणाची वेळ मागेपुढे होऊ शकते. नाष्ट्यासाठी सुक्या स्वरूपाच्या पदार्थांचा आणि बिस्कीटे यांचा आधार घ्यावा लागतो. काही अचानक अडचणी येऊ शकतात. त्यावेळी ॲडजेस्टमेंट करावी लागेल.

२) परिक्रमेदरम्यान गैरसोयी अधिक प्रमाणावर व्हायची शक्यता आहे. कारण तेथील परिस्थिती ही सतत बदलत असते. तिच्यावर नियंत्रण करणे खूप अवघड आहे. त्यावेळी अनेकदा नाईलाज होतो. या सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये ज्यांना ॲडजेस्ट होणे शक्य असेल त्यांनीच या परिक्रमेमध्ये सहभागी व्हावे, ही विनंती. कर्दळीवन सेवा संघ म्हणजे ट्रॅव्हल एजन्सी किंवा फॅसिलिटी/ सर्व्हिस प्रोव्हायडर नाही. ज्यांना उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा करायची तीव्र इच्छा आहे, त्यांचेसाठी सेवा भावनेने आम्ही हे कार्य करीत आहोत. त्यामुळे परिक्रमेची फी भरली आहे, आता आम्हाला सर्व लिहिलेल्या सुविधा पुरवायलाच हव्यात, असा आग्रह धरता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती. आपल्याला परिक्रमेसंबंधी ज्या काही सूचना करायच्या असतील त्या परिक्रमा संपल्यावर लेखी स्वरूपात कराव्यात. तेथील पवित्र आणि मंगल परिसरात आयोजक आणि इतर कोणाबरोबर कोणत्याही प्रकारचे वाद घालू नये. परिक्रमेमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेले नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील. त्याबाबत नंतर तक्रार चालणार नाही. त्या सर्वांची माहिती नोंदणी अगोदरच करुन घ्यावी ही विनंती. ऐनवेळी परिस्थितीनुरूप परिक्रमेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच परिक्रमेसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

३) बसमध्ये ज्येष्ठ नागरिकांना पुढील आसनव्यवस्था देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

४) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.